


# वास्तुविज्ञान

**पंचमहाभूतांनी बनलेल्या वास्तुशास्त्राचा मानवी आयुष्यावर सतत प्रभाव पडत असतो. अशा या वास्तुशास्त्राला विज्ञानाचा आधारही आहे. या वास्तुविज्ञानाचा बारकाईने अभ्यास केला आणि त्याला अनुरूप उपाययोजना केल्या तर आपण आपली वास्तू सदैव सुखकारक करू शकतो.**

**:: डॉ. तुषार सावडावकर**

**वास्तुशास्त्र** हे जल, अग्नी, वायू पृथ्वी आणि आकाश या पंचमहाभूतांनी आणि अष्टदिशांनी बनलेले आहे. अष्टदिशांमध्ये पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या चार मुख्य दिशा असून ईशान्य, आग्नेय, वायव्य आणि नैऋत्य या चार उपदिशा आहेत. वास्तुशास्त्रात उपदिशांमध्ये जैविक आणि प्राणिक अशा दोन्ही प्रवाहांचा प्रभाव दिसत असल्यामुळे या दिशांना अत्यंत महत्त्व आहे. उत्तर आणि पूर्व या उर्जेच्या उगम दिशा असून या दिशांवर चंद्र नाडीची सत्ता असते. या नाडीच्या प्रवाहामुळे स्थैर्य, क्षेम, मांगल्य, कल्याण आणि आयु याची प्राप्ती होते, तसेच दक्षिण, नैऋत्य आणि पश्चिम या अस्त दिशा असून यावर सूर्य नाडीची सत्ता असते.

पूर्व दिशेस टेकडी असता किंवा पूर्व दिशेस जिना किंवा टॉयलेट असता किंवा पूर्वेस कमी जागा असून पश्चिमेस मोठे अंगण असता पूर्व दिशा बंद आहे असे म्हटले जाते. याचाच अर्थ आदित्य प्रवाह बिघडतो. यासाठी ही दिशा शुभ प्रवाही करण्यासाठी पूर्व दिशेस श्वेत संगमरवरी फरशी बसवावी आणि त्याखाली २० ग्रॅम चांदी पुरावी.

घराच्या छपराचा उतार पश्चिम दिशेस असता पश्चिमेस बाल्कनी असल्यास, पश्चिमेस विहीर, बोअरिंग, अंडरग्राऊड टँक असल्यास, पश्चिमेचे अंगण मोठे असता, पश्चिमेस मोकळा प्लॉट असता, पश्चिम उतारावर घर असता अशावेळी पश्चिम दिशा प्रवाही आहे असे म्हटले जाते. या वास्तू रचनेत शनीच्या कारकत्वाचे शिसे साधारणत: पाच किलो पश्चिम दिशेस पुरावे. पश्चिमेच्या बाल्कनीत शनीचे नीलम रत्न मंत्रोपच्चारसहित फरशीखाली स्वस्तिकासह पुरावे. पश्चिमेकडील खिडक्यांच्या काचा निळ्या कराव्यात.

उत्तरेस जीना, टॉयलेट असणे, घर उत्तर खंडात असणे, उत्तरेस खिडकी नसणे, उत्तरेस टेकडी असणे अशा प्रकारे उत्तर दिशा जड आणि बंद असणे असे म्हणता येईल. यामुळे स्त्रियांच्या ऋतू पर्वात बदल आणि जीवनात मानसिक संघर्ष दाखविते. उत्तर दिशा प्रवाही होण्यासाठी उत्तर प्रभागात चकचकीत रंग, आरसे, स्फटीक, झुंबर यांचा उपयोग करून त्याखाली मोती आणि चांदी पुरल्यास ते शुभकारक ठरेल. उत्तर दिशा प्रवाही होण्यासाठी उत्तर प्रभागात विहीर,



बोअरींग, खेलगट खड्डा, कारंजे असणे फायदेशीर ठरेल.

दक्षिण दिशा ही सूर्य नाडची निदर्शक असून छप्पराचा उतार दक्षिणेस असणे, दक्षिणेस विहीर, बोअरिंग असणे, अंडरग्राऊंड टँक असणे, दक्षिणेस मोकळा प्लॉट असणे, दक्षिण उतारावर घर असणे, दक्षिणेस पत्र्याची शेड असणे अशा प्रकारच्या स्थितीत दक्षिण दिशा हलकी आणि प्रवाही असणे असे म्ळणता येईल. यासाठी दक्षिण बाल्कनी, दक्षिण टेरेस, दक्षिण अंगण यामध्ये तीन किलो शिसे शनिवारी पुरावे. तसेच वैडुर्य रत्न आणि स्वस्तिक याची जमिनीखाली स्थापना करावी. दक्षिणेकडील खिडक्यांना पिवळी काच वापरावी आणि प्रकाशाच्या प्रवाहावर पृथ्वीतत्वाचे बंधन आणावे किंवा दक्षिणेकडे पिवळ्या फरशीची रचना करावी. दक्षिणेकडील विहीर, बोअरिंग, अंडरग्राऊंड वॉटर टँक बुजवून टाकावे.

वास्तुशास्त्राचा नुसताच एकाच अंगाने विचार न करता पंचमहाभुते, तत्व, जडत्व, अष्टदिशा-उगम आणि अस्त, वास्तूमंडल, रत्न अध्याय, धातू अध्याय अशा विविध अंगाचा विचार करून आपली वास्तू सुखकारक, समृद्धिकारक करून घेऊ शकतो. ■

**वास्तुशास्त्रात उपदिशांमध्ये जैविक आणि प्राणिक अशा दोन्ही प्रवाहांचा प्रभाव दिसत असल्यामुळे या दिशांना अत्यंत महत्त्व आहे.**